# मे. मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ५ आणि ६, सर्व्हे नंबर ३२९ वाडा औदयोगिक विकास संकुल, हमरापूर, तालुका वाडा, जिल्हा पालघर या कंपनीचे प्रस्तावित कृत्रिम सेंद्रिय रसायने (अनसॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन) उत्पादन प्रकल्पाविषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त

केंद्रीय वने, पर्यावरण व हवामान बदल विभाग, भारत सरकार यांचे पर्यावरण आघात मूल्यांकन (इ.आय.ए.) अधिसूचना २००६, दि. १४/०९/२००६ आणि आतापर्यंत सुधारित अधिसूचनेच्या तरतुदीनुसार मे. मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ५ आणि ६, सर्व्हे नंबर ३२९, वाडा औद्योगिक विकास संकुल, हमरापूर, तालुका वाडा, जिल्हा पालघर, महाराष्ट्र यांचे प्रस्तावित "कृत्रिम सेंद्रिय रसायने (अनसॅच्युरेटेड पॉलिस्टर रेझिन) उत्पादन प्रकल्पाबाबत" पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीसाठी, म. प्र. नि. मंडळाचे मुख्यालय यांच्याकडे दि.१९.०५.२०२६ रोजी अर्ज प्राप्त झाला होता. याबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याकरीता म. प्र. नि. मंडळ, मुख्यालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केले असता, मा. सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) मप्रनि, मुंबई यांचे पत्र क्र. MPCB/667/2026-002/E-3233325, दि. २५.०५.२०२६ अन्वये उप-प्रादेशिक कार्यालय कल्याण-३ या कायार्लयास पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेण्याचे आदेश देण्यात आले होते. सदर प्रकल्पाचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांच्या पॅनेलची नियुक्ती करण्यात आली.

१) मा. **जिल्हाधिकारी, पालघर** अथवा अप्पर जिल्हादंडाधिकारी, पालघर दर्जाच्या कमी नाही असे त्यांचे प्रतिनिधी — **अध्यक्ष**

२) **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी** प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण — **सदस्य**

३) **उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण-३** — **संयोजक**

सदर निर्देशानुसार मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या मान्यतेने जाहीर जनसुनावणीचे अध्यक्ष मा. श्री. सुभाष भागडे, अपर जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. मे. मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं.१८, सर्व्हे नं. १२३ (नवीन सर्व्हे नं.३२९), हमरापूर, तालुका वाडा, जिल्हा पालघर येथे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीची जाहीर सूचना सुनावणीच्या एक महिना आधी दिनांक ०५.०७.२०२६ रोजी मराठी दै. सकाळ व इंग्रजी दैनिक द फ्री प्रेस जर्नल या वर्तमानपत्रामध्ये जाहीर सूचना प्रकाशित करण्यात आले होते. पर्यावरण आघात मुल्यांकनाचा अहवाल व कार्यकारी सारांश यांच्या प्रती मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील ठिकाणी सर्वांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१. पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासन भवन, १५ वा माळा, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, दक्षिण मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, शिव (पूर्व), मुंबई- ४०० ०२२.
४. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर जिल्हा
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर
६. उप विभागीय अधिकारी, ता. वाडा, जि. पालघर
७. प्रादेशिक अधिकारी कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण
८. तहसिलदार, वाडा तहसिल कार्यालय, जि. पालघर

कृ.मा.प.

९. गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाडा, ता. वाडा, जि. पालघर
१०. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर, जि. पालघर
११. ग्रामपंचायत कार्यालय-हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर

तसेच वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मुळ उद्देश, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस सदर प्रकल्पाविषयी माहिती, प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा यांची माहिती सामान्य जनतेस देणे, त्यांनी दिलेल्या सूचनांचा विचार करणे, याबाबबत परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ यांनी प्रकल्पाबाबत आक्षेप, सूचना लेखी अथवा तोंडी स्वरुपात अथवा ई-मेलद्वारे कळवाव्यात असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सदर प्रकल्पाबाबत प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण येथे २ सूचना ई-मेलद्वारे प्राप्त झाल्या होत्या (प्रत सलग्न). तसेच जनसुनावणीदरम्यान प्राप्त होणाऱ्या सूचना/ हरकती यांचीही नोंद घेण्यात आली आहे.

मे. मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या उद्योगाचे पर्यावरण विषयक जनसुनावणी मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांच्या उपस्थितीत दि. ११.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०५ वा. सुरु करण्यात आली. सदर सुनावणीस लोकप्रतिनिधी, उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, वृत्तपत्र/ वृत्तवाहिनीचे प्रतिनिधी, पर्यावरण तज्ञ, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील सामान्य नागरीक असे एकूण २९ प्रतिनिधी उपस्थित होते, याबाबतची यादी सोबत जोडलेली आहे. तसेच या जनसुनावणीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१. मा. श्री. सुभाष भागडे, अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर
२. श्री. सतिश पडवळ, सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण
३. डॉ. सीमा उदय दळवी, संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी, कल्याण-३
४. श्री. जयप्रकाश भुसारा, क्षेत्र अधिकारी, उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कल्याण-३

संयोजक तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण-३ यांनी मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांच्या परवानगीने जनसुनावणीबाबत प्रस्तावना सादर केली आणि प्रकल्प प्रवर्तकास प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक तांत्रिक बाबींसंदर्भात पॉवरपॉईंटचे सादरीकरण करण्यास विनंती केली. तसेच ही पर्यावरण विषयक जनसुनावणी असल्याने पर्यावरण विषयक प्रश्न विचारण्यात यावे असेही विनंती केली.

त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक मे. एनवायरोस्पीयर कन्सल्टन्ट व इंजिनिअर्स एलएलपी यांचेकडून मे.मोरेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नं. ५ आणि ६, सर्व्हे नंबर ३२९, वाडा औद्योगिक विकास संकुल, हमरापूर, तालुका वाडा, जिल्हा पालघर यांचे प्रस्तावित प्रकल्पाचे पॉवरपॉईंट (पी.पी.टी.) सादरीकरणासह तपशिलवार माहिती सर्वांच्या निदर्शनास आणून दिली.

तद्नंतर मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांनी सांगितले की, कंपनीच्या प्रकल्प प्रवर्तकाने तपशिलवार सादरीकरण केले असून सदर सारांश आणि कंपनीने दिलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्पाबाबत कोणाला काही सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर त्यांनी मांडाव्यात असे आवाहन करण्यात आले. तसेच आपला वेळ वाया जाऊ नये म्हणून एखादा मुद्दा उपस्थित केला असेल तर त्याची पुनरावृत्ती होऊ नये असेही नमूद केले आणि जनसुनावणी दरम्यान लेखी सूचना द्यावयाच्या असतील तर म.प्र.नि. मंडळाच्या प्रतिनिधीकडे दाखल करण्यास सांगितले.

कृ.मा.प.

त्यानुसार खालीलप्रमाणे उपस्थितांकडून सूचना, हरकती, प्रश्न उपस्थित करण्यात आले व त्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकाने सविस्तर अभिप्राय दिले :-

१) **श्री. विलास तुकाराम धनवा, मौजे कुर्ले, ता. वाडा, जि. पालघर**- स्थानिक लोकांना कंपनीमध्ये रोजगार भेटेल काय ?

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, सादरीकरणामध्ये सांगिल्याप्रमाणे प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात ५० लोकांना तसेच प्रकल्पाचे परिचालन (Operational) टप्प्यात ७० लोकांना रोजगार भेटणार आहे. तसेच प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात रोजगार देतांना स्थानिक लोकांना आणि प्रकल्पाचे परिचालन टप्प्यात शैक्षणिक पात्रतेनुसार स्थानिक लोकांना प्राधान्याने रोजगार देण्यात येईल.

२) **श्री. नितिन राजू मरले, मौज कळमखांड, ता. वाडा, जि. पालघर**- या प्रकल्पामधून केमिकलची गळती होऊ शकते काय ?

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, हा प्रकल्प रसायनाचा प्रकल्प असल्यामुळे गळती होऊ नये म्हणून प्रत्येक रिॲक्टरला कंडेन्सर बसविण्यात आले असून त्यांना अलार्म सिस्टीम बसविण्यात आलेले आहे. त्यामुळे गळती झाल्यास लगेच अलार्म सिस्टीममुळे गळती थांबविण्याची दक्षता घेण्यात आल्याने वायू गळती होणार नाही.

३) **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ**- बेरोजगारी हे भारतातील मुख्य प्रदूषण असून केंद्र आणि राज्य सरकारमार्फत दरवर्षी ५ ते ६ लाख रोजगाराच्या तुलनेत उद्योगांकडून दरवर्षी ९० लाखाच्या वर नोकऱ्या प्राप्त होत असल्याने पर्यावरण तज्ञ या नात्याने श्री. रेड्डी यांनी कंपनी व्यवस्थापनाला मनापासून शुभेच्छा देतो असे म्हटले. प्रकल्प प्रवर्तकामार्फत जल, हवा आणि जमिनीबाबत केलेल्या बेसलाईन सर्व्हे चांगला असून त्याबाबत समाधानी असल्याचे सांगितले. कंपनीकडून प्रस्तावित केलेला हरित पट्टा २३ टक्के असून त्यामध्ये अजून १० टक्के हरित पट्टा वाढविणे शक्य आहे काय? असे विचारले. तसेच कंपनीच्या प्रकल्पामध्ये जर हरित पट्टा शक्य नसेल तर गावामध्ये प्रदूषण कमी करणाऱ्या रोपांची लागवड करणे आवश्यक आहे असे म्हटले. तसेच स्थानिकांना प्राधान्याने रोजगार द्यावयाचे असल्यास शासनाच्या मदतीने रोजगारासाठी युवकांना प्रशिक्षण देऊन रोजगार दिल्यास त्याचा कंपनी व्यवस्थापनाला आणि बेरोजगार युवकांना फायदा होईल असे नमूद केले. कंपनी व्यवस्थापनामार्फत ग्रामस्थ, सरपंच यांची समन्वय समिती तयार करावे व सदर समितीमार्फत हरित पट्टा, जल सिंचन आणि रोजगार याबाबत समन्वयाने निर्णय घ्यावे असे सांगितले. शेवटी पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे कोणत्याही अटीविना प्रकल्प सुरु करण्यास मंजूरी देण्याबाबत शिफारस करीत आहे असे म्हटले व सविस्तर अहवाल तयार केल्याबद्दल प्रकल्प प्रवर्तकांचे (पर्यावरणीय सल्लागार) अभिनंदन केले.

४) **श्री. सार्थक विलास गरेल, हमरापूर, ता. वाडा, जि. पालघर** – या प्रकल्पामधून काय काय प्रदूषण होणार आहे आणि सांडपाणी तसेच वेस्ट केमिकल यांची कशा प्रकारे विल्हेवाट लावली जाईल?

प्रकल्प प्रवर्तक यांनी म्हटले की, कोणत्याही प्रकल्पामध्ये प्रदूषणाचे मुख्य स्त्रोत हे वायू प्रदूषण आणि पाण्याचे प्रदूषण महत्वाचे असतात. यामध्ये जल प्रदूषण होणार नाही कारण या प्रकल्पामध्ये शुन्य निस्सारण प्रक्रिया (ZLD) चा अवलंब केल्यामुळे प्रकल्पातून निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन प्रकल्पामध्येच

कृ.मा.प.

सदर पाण्याचा वापर होणार असल्याने जल प्रदूषण शक्य नाही. तसेच वायू प्रदूषणाच्या बाबतीत प्रकल्पामध्ये जो बॉयलर वापरणार आहे त्यासाठी एल.पी.जी. गॅस या शुध्द इंधनाचा वापर करण्यात येणार असल्याने वायू प्रदूषण होणार नाही. केमिकलचे प्रदूषण होऊ नये यासाठी व्हीओसी कंट्रोलर हे रिअॅक्टर सिस्टीमला किंवा डबल कंडीशन सिस्टीम हे रिअॅक्टरवर बसविले जातात, त्यासोबतच सेन्सर सिस्टीम बसवितात, ज्यामुळे वायुचे प्रदूषण हे पूर्णता न्युनतम करण्यात येतील आणि वायुचे प्रदूषण होणार नाही.

५) **श्री.मोहन रामू धानवा, मौजे गालतरे, ता. वाडा, जि. पालघर** —या प्रकल्पात किती झाडे लावण्यात येतील. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये एकूण ६५८ झाडे लावणार आहेत. कंपनी व्यवस्थापनाचा एकूण ५०० झाडांचा बजेट आहे परंतु भविष्याच्या दृष्टीकोनातून ६५८ झाडे लावण्यात येणार आहे. त्या व्यतिरिक्त सी.ई.आर. अॅक्टीव्हीटी अंतर्गत रस्त्याच्या कडेला तसेच कंपनीच्या प्लॉटच्या मागच्या बाजूच्या जागेमध्ये ४०० ते ६०० झाडे लावलेली असून प्रकल्पाच्या अवती भोवती एकुण १००० झाडे लावली जाणार आहेत.

सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण यांनी औद्योगिक सांडपाण्याबाबत काय करणार आहात असे विचारले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, शून्य निष्कासन नंतर सांडपाण्यावर कमी सीओडी आणि जास्त सीओडी दोन्ही वेगवेगळे करणार आहे, त्यानंतर एम. इ. ई (MEE) आणि एम.ई. नंतर, ए.टी.एफ.डी. (ATFD) करुन शेवटी कुलींग टॉवर्स मध्ये पुनर्प्रक्रिया केले जाणार आहे. फक्त एस.टी.पी. चे पाणी हरित पट्ट्याला वापरणार आहे असे सांगितले.

तद्नंतर मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांनी या जनसुनावणीची नोटीस प्रसिध्द केल्यापासून म.प्र.नि. मंडळाकडे ई-मेल द्वारे सूचना प्राप्त झाल्या आहेत असे नमूद केले. तसेच आज या ठिकाणी जवळजवळ ५ जणांनी तोंडी सूचना, हरकती मांडल्या असून त्यांचा इतिवृत्तामध्ये समावेश करण्यात येईल असे सांगितले.

**निष्कर्ष** : जनसुनावणीमध्ये लोकप्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी, ग्रामस्थ, व्यवसायिक, पर्यावरण तज्ञ सहभागी झाले होते आणि त्यांनी प्रकल्पाच्या संदर्भात अपेक्षा व आक्षेप व्यक्त केले. मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर व जनसुनावणी समितीचे सदस्य, प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून लोकप्रतिनिधी व गावकरी यांचा पर्यावरणविषयक बाबींचा विरोध, सूचना, अपेक्षा इत्यादींबाबतची नोंद घेतली आहे. शेवटी मा. अध्यक्ष तथा अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर यांनी शांततेच्या मार्गाने सुनावणीत सहभाग घेऊन आपले मत नोंदविल्याबाबत सर्व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणीची प्रक्रिया संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**डॉ. सीमा उदय दळवी**
समितीचे संयोजक आणि
उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण-३

**(श्री. सतीश पडवळ)**
समितीचे सदस्य आणि
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कल्याण

**(श्री. सुभाष भागडे)**
समितीचे अध्यक्ष आणि
अपर जिल्हा दंडाधिकारी, पालघर जिल्हा